ePaper

वर्ष - 7 । अंक -9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । शुक्रवार , दि.5 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडमध्ये अवकाळी पावसाची 'धुँवाधार'



## आतील पानांत


- पुणे मेट्रोच्या 'स्ट्रक्चरल ऑडिट'चा नवा घोळ
- बाजार समित्यांची सूत्रे प्रामाणिक हातात द्या
- सत्तासंघर्षाचा निकाल लवकरच


# आमदारांचा वाढदिवस; राष्ट्रवादीला इशारा!

## » ना नेता, ना प्रोटोकॉल : शहर राष्ट्रवादीतील गटबाजी पुन्हा चर्चेत

ग्राउंड रिपोर्ट

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे एकमेव आमदार अण्णा बनसोडे यांचा वाढदिवस पिंपरी मतदार संघात विविध उपक्रमांनी साजरा झाला. मात्र, राष्ट्रवादीत सुरू असलेल्या प्रदेश पातळीवर घडामोडी आणि गेल्या काही महिन्यांपासून आमदार बनसोडे यांची संभ्रमात टाकणारी राजकीय भूमिका... अशा कारणांमुळे पार्टीस्तरावर कोणतेही 'सेलिब्रेशन' पहायला मिळाले नाही.**



शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी नाममात्र शुभेच्छा भेट घेतली. मात्र, शहरात कुठेही पक्षाचे बॅनर दिसले नाही किंवा जाहिरात करण्यात आली नाही. एखाद्या ज्येष्ठ नेत्याचा वाढदिवस साजरा होत असताना पार्टीकडून एखादा उपक्रम राबवला जातो. मात्र, तसे चित्र दिसले नाही. त्यामुळे आमदार अण्णा बनसोडे म्हणजे शहर राष्ट्रवादीतील दुर्लक्षित नेता आहे का? असा प्रश्न बनसोडे समर्थकांमधून उपस्थित केला जात आहे. दुसरीकडे, आमदार बनसोडे यांच्या समर्थकांनी स्वत: मतदार संघासह शहरातील काही ठिकाणी वाढदिवस अभिष्ठचिंतनाचे फलक लावले आहेत. काही समर्थकांनी समाजिक उपक्रमही घेतले आहेत.

### अतिमहत्त्वाकांक्षा लोकांमुळे बनसोडे संघटनेवर नाराज?

**» राष्ट्रवादीतील स्थानिक कुरघोडीच्या राजकारणामुळे आमदार बनसोडे काहीसे नाराज आहेत. त्यामुळे अजित पवार म्हणतील तसे, आपल्याला खालच्या लोकांचे देणे-घेणे नाही, अशी ठाम भूमिका त्यांच्या कृतितून दिसते. दुसरीकडे, शहरातील विद्यमान पदाधिकारी भाजपातील काही नाराज आणि अतिमहत्त्वाकांक्षी लोकांच्या मदतीने बनसोडे यांना 'साईडट्राईक' करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पक्षात ज्येष्ठ असतानाही कार्यक्रम, सभा, संमेलनामध्ये मान-सन्मान मिळत नाही, असेही बनसोडे समर्थकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अजित पवार यांचे कट्टर समर्थक असलेले बनसोडे संघटनेवर मात्र कमालीचे नाराज आहेत, असे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे.**

मात्र, त्यावर पक्षाच्या प्रदेश किंवा स्थानिक कोणत्याही नेत्याचा फोटो 'प्रोटोकॉल'नुसार दिसत नाही.

वास्तविक, आमदार बनसोडे यांनी पार्टीचा प्रोटोकाल कधिच जुमानला नाही. राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पहाटेचा शपथविधी केला. त्यावेळी बनसोडे अजितदादांच्या समर्थनार्थ उतरले होते. काही दिवसांपूर्वी अजित पवार 'नॉट रिचेबल' झाले. भाजपासोबत जाण्याबाबत चर्चा सुरू झाली. त्यावेळीसुद्धा बनसोडे यांनी "अजित पवार हाच माझा पक्ष" अशी भूमिका घेत राज्यात लक्ष वेधले होते. त्यामुळे अण्णा बनसोडे हेसुद्धा स्थानिक पदाधिकाऱ्यांना जुमानत नाहीत, असे स्पष्ट झाले आहे. हा शहरातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना सूचक इशारा समजला जात आहे.

# शहरातील मुख्य रस्ते होणार 'हायटेक'!

## » महापालिका प्रशासनाची तयारी:रस्त्यांचे नूतनीकरण करणार

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात शहरीकरण व नागरिकरणामुळे विविध सार्वजनिक वाहतूक पर्याय निवडणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार स्थापत्य प्रकल्प विभागाने रस्त्यांचे नूतनीकरण करण्याचे नियोजन केलेले आहे.**



टेल्को रस्ता हा शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक रस्ता आहे. त्यापैकी गवळी माथा ते सेच्युरी एन्का चौकापर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने पुर्ण रुंदीने विकसित करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार या रस्त्याचे सलग पादचारी मार्ग, सलग सायकल मार्ग, आवश्यक त्या ठिकाणी सेवा रस्ता व RECREATIONAL AREA तयार करणे या संकल्पनेआधारे रस्त्याचे विकसन करण्याचे स्थापत्य विभाग,'क' क्षेत्रिय कार्यालयामार्फत नियोजन करण्यात येत आहे.

दरम्यान याच पद्धतीने डांगे चौक ते हिंजवडी हद्दीपर्यंत, कुणाल आयकॉन रस्ता शिवार चौक ते गोविंद गार्डन पर्यंत आणि बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौकापर्यंतच्या रस्त्याचे नुतनीकरण करण्याचे महानगरपालिकेने नियोजन केले असून त्यामध्ये नागरिकांच्या सूचनांचा अंतर्भाव करून पुर्ण रस्त्याचे डिझाईन अंतिम करावयाचा महानगरपालिकेचा मानस आहे.

### नागरिकांचे अभिप्राय मागवले...

**» सद्यस्थितीतील सेवा रस्ता, पादचारी मार्ग, सायकल चालविणेस सुरक्षित असा नियोजित रस्ता याचे सादरीकरण महानगरपालिकेच्या WEBSITE व स्मार्ट सिटी WEBSITE APP येथे पाहण्यास पालिका उपलब्ध करून देणार आहे. नागरिकांनी याबाबत त्यांचे अभिप्रायः मनपाच्या संकेतस्थळ WWW.PCMCINDIA.GOV.IN, स्मार्टसिटी संकेतस्थळ CIVIL@PCMCINDIA.GOV.IN यावर प्रसिद्धीपासुन १० दिवसाच्या आत द्यावेत, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाचे सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी केले आहे.**

# पुणे मेट्रोच्या 'स्ट्रक्चरल ऑडिट'चा नवा घोळ!

## सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतिम अहवाल महामेट्रोकडे सादर

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मेट्रो स्थानकांच्या संरचनात्मक लेखापरीक्षणाचा (स्ट्रक्चरल ऑडिट) घोळ आणखी वाढला आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतिम अहवाल महामेट्रोकडे सादर केल्याचा दावा केला आहे. याचवेळी महामेट्रोने अहवाल अजून मिळालाच नसल्याचे म्हटले आहे. यामुळे दोन्ही संस्थांची विसंगत भूमिका समोर आली असून, हा अहवालही वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.**

पुणे मेट्रो स्थानकांच्या उभारणीत आढळलेल्या त्रुटी पुण्यातील काही ज्येष्ठ अभियंत्यांनी समोर आणल्या होत्या. मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत दाखल जनहित याचिकेवर उच्च न्यायालयात १७ एप्रिलला सुनावणी झाली. त्या वेळी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट करून सात दिवसांत अहवाल सादर करण्यात येईल, असे न्यायालयाला सांगितले होते. याचबरोबर विद्यापीठातील बडतर्फ सहयोगी प्राध्यापक ईश्वर सोनार यांचा स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राथमिक असल्याचे म्हटले होते.

यानुसार, विद्यापीठाकडून मेट्रोच्या वनाज ते गरवारे महाविद्यालय या मार्गावरील स्थानकांचे अंतिम स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. विद्यापीठातील प्राध्यापक बी.जी. बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली हे ऑडिट करण्यात आले. यात काही प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश होता. याबाबत बिराजदार म्हणाले, की आमच्या पथकाने ४ ते ५ दिवस मेट्रो स्थानकांची तपासणी केली. सात दिवसांत अहवाल अंतिम न झाल्याने विद्यापीठाने महामेट्रोकडे दोन ते तीन दिवस मुदतवाढ



मागितली होती. त्यानुसार या वाढीव मुदतीत अहवाल तयार केला. हा अहवाल दोन ते तीन दिवसांपूर्वी महामेट्रोकडे सुपूर्त करण्यात आला आहे.

महामेट्रोने हा अहवाल मिळाला नसल्याचा दावा केला आहे. याबाबत महामेट्रोचे जनसंपर्क अधिकारी हेमंत सोनावणे म्हणाले,की विद्यापीठाने मेट्रो स्थानकांबाबत काही तांत्रिक प्रश्न आम्हाला विचारले आहेत. याचबरोबर काही निरीक्षणेही त्यांनी नोंदवली आहेत. त्यावर आम्ही त्यांना उत्तर देणार आहोत. त्यानंतर सीओईपीकडून अंतिम अहवाल आम्हाला मिळेल.

विद्यापीठ आणि महामेट्रो यांनी घेतलेल्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबाबत दोन्ही सरकारी संस्था एकमेकांकडे बोट दाखवत असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे. दोन्ही संस्थांकडून जबाबदारी झटकण्याचा प्रकार सुरू असल्याची चर्चा सुरू आहे.

### याचिकाकर्ताही अहवालाचा प्रतीक्षेत

**मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत उच्च न्यायालयात धाव घेणारे ज्येष्ठ अभियंते नारायण कोचक अद्याप अहवालाच्या प्रतीक्षेत आहेत. मेट्रोला सात दिवसांत अहवाल सादर केला जाईल, असे उच्च न्यायालयात विद्यापीठाकडून सांगण्यात आले होते. या अहवालाची प्रत कोचक यांना देण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. विद्यापीठ अहवाल दिल्याचे म्हणत असले तरी कोचक यांना मात्र अद्याप अहवाल मिळालेला नाही.**

> मेट्रो स्थानकांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतिम अहवाल दोन-तीन दिवसांपूर्वी महामेट्रोला सादर केला आहे. हा अहवाल गोपनीय असल्याने त्यातील निरीक्षणे आणि निष्कर्ष याबद्दल सांगता येणार नाही. महामेट्रोच याबद्दल अधिकृतपणे सांगू शकेल.
>
> - बी.जी.बिराजदार, प्राध्यापक, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ

> सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाकडून मेट्रो स्थानकांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल महामेट्रोला मिळालेला नाही. त्यांनी काही तांत्रिक प्रश्न विचारले असून, आम्ही त्याला उत्तर देणार आहोत. त्यानंतर अंतिम अहवाल ते आम्हाला देतील.
>
> - हेमंत सोनावणे, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो

---

# पुण्यात डीआरडीओ संचालकाला ATS कडून अटक

## हनीट्रॅपमध्ये सापडून पाकिस्तानला माहिती दिल्याचा संशय

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**या प्रकरणाची अधिक माहिती अशी आहे की, संरक्षण संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ यांनी पुणे येथील त्यांच्या कार्यालयामधून पाकिस्तान इंटेलिजन्स ऑपरेटिव्ह (PIO) चे हस्तक यांच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हॉटअपद्वारे व्हाईस मेसेज, व्हिडिओ कॉलने संपर्कात राहिले असल्याची माहिती ATS ला मिळाली होती.**

त्यासोबत डि. आर. डी. ओ. चे शास्त्रज्ञ पदाचा गैरवापर करत त्यांच्या ताब्यात असलेली संवेदनशील शासकिय माहिती पाकिस्तानला पुरवत असायचे. प्राथमिक अंदाजानुसार हनी ट्रॅपमध्ये सापडल्याने ते पाकिस्तानला माहिती देत असायचे असा संशय आहे. दहशतवाद विरोधी पथकाने ही कारवाई केली आहे.




### पाकच्या गुप्तचर यंत्रणेशी संबंधित महिलेच्या संपर्कात

**हनीट्रॅपमध्ये अडकून त्यांनी संवेदनशील माहिती पाक इंटेलिजन्स ऑफिसरला दिल्याचं स्पष्ट झालं आहे. निवृत्तीला सहा महिने राहिले असताना ते हनीट्रॅपमध्ये फसले. सहा महिने मोबाईलच्या माध्यमातून ते पाकच्या गुप्तचर यंत्रणेशी संबंधित असलेल्या महिलेच्या संपर्कात असल्याची माहिती आहे. त्यामुळे एटीएसने त्यांना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.**

---

# मध्यरात्री स्फोट, २ मजली इमारत ढासळली, दगड, विटा दुसऱ्या रस्त्यावर

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



सातारा रस्त्यावरील डीमार्ट शेजारी इलेक्ट्रॉनिक आणि मोबाईल शॉपीमध्ये दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास मोठा स्फोट झाला. स्फोट एवढा भीषण होता की इमारतीच्या भिंतींना तडे बसले. दुकानातील सगळं सामानही जळून खाक झालं. या स्फोटाचं सीसीटीव्ही फुटेज आता समोर आलंय. एक व्यक्ती दुकानाचं शटर उघडत असताना तिथे मोठा स्फोट झाला. मात्र तो स्फोट कशामुळे झाला याचा तपास आणि अंदाज अजून कुठेही लागलेला नाहीये. म्हणूनच याचा तपास आता एटीएसमार्फत करणार असल्याची माहिती सहकारनगर पोलिसांनी दिली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दुकानाचा मालक आणि एक व्यक्ती रात्री दुकानात होते. मात्र दैव बलवत्तर म्हणून या दोघांचेही प्राण वाचले. सद्या ते ससून रुग्णालयात उपचार घेत आहेत. रात्री पावणे तीन वाजता आग लागल्याची माहिती अग्निशमन दल नियंत्रण कक्षाला मिळाली. अग्निशमन दलाकडून सहा फायरगाड्या, दोन वॉटर टँकर आणि एक रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या. माहितीनुसार पुणे सातारा रस्त्यावर इंद्रायणी कॉम्प्लेक्सच्या देवयानी इलेक्ट्रॉनिक होम अप्लायन्सेस अँड मोबाईल शॉपी दुकान नाव होतं. त्या दुकानाला आग लागली होती.घटनास्थळी ०३ दुकानांमधे मोठ्या प्रमाणात आग लागली होती. दुकान होम अप्लायन्स, दुकान किचन अप्लायन्स व दुकान मोबाईल शॉपी अशी दुकाने होती. घटनास्थळी गॅस शेगडी, चिमण्या, गॅस गिझर, वॉटर प्युरिफायर, फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, मोबाईल, बॅटरी अशा अनेक प्रकारच्या वस्तू होत्या. याठिकाणी आग लागून स्फोट झाल्याने दोन मजली इमारतीची मोठी पडझड झाली आहे. स्फोट इतका मोठा होता की दुकानांचे शटर, भिंतीचे कॉलम, दगड, विटा व इतर साहित्य पलीकडील रस्त्यावर पडले होते. एक दुचाकी पूर्णपणे जळाली.दरम्यान, भीषण आगीत दोन नागरिक जखमी झाले असून यामधे एक इसम दुकानाचा मालक असल्याचे स्थानिकांकडून समजते. अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणली असून पुढील धोका टळलेला आहे.

# बेकायदा होर्डिंगवर कोर्टाचा हातोडा!

## कारवाई करण्याचा मार्ग मोकळा : महापालिका प्रशासनाकडून 'सफाई'ची तयारी

। पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शहरातील होर्डिंगधारक संघटना आणि महापालिका यांनी परस्पर संमतीने सादर केलेला मसुदा उच्च न्यायालयाने स्वीकृत करून त्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे योग्य पद्धतीने होर्डिंग उभे केलेल्या होर्डिंगधारकांचे होर्डिंग निल. मात्र, शासनाच्या ९ मे २०२२ रोजीच्या नियमांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. त्यामुळे शहर विद्रूप करणाऱ्या बेकायदेशीर होर्डिंग हटविण्याचा मार्ग मोकळा झाला.**







किवळे येथे मागील आठवड्यात अनधिकृत होर्डिंग पडून पाच जणांचा मृत्यू झाला, तर तिघे जखमी झाले. त्यानंतर आयुक्तांनी बैठक घेऊन कारवाईचे आदेश दिले. शहरातील अनधिकृत होर्डिंगसंदर्भात उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली आहेत. या विभागाची जबाबदारी सहायक आयुक्त निलेश देशमुख यांच्याकडे सोपविली आहे. होर्डिंग काढण्यासाठी नोटीस बजावली होती. मात्र, जाहिरात असोसिएशन या विरोधात न्यायालयात गेल्यानंतर हे होर्डिंग 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश दिले होते.

अनधिकृत होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर महापालिकेने उच्च न्यायालयाकडे तत्काळ सुनावणी घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार २५ एप्रिल रोजी सुनावणी झाली. यात ही याचिका निकाली काढण्यात आली.



> **किवळे येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर न्यायालयाला विनंती केल्यानंतर न्यायालयाने तत्काळ सुनावणी घेतली. न्यायालयाने यापुढची संपूर्ण निर्णय प्रक्रिया ही कालबद्ध पद्धतीने राबविण्याचे आदेश दिलेले आहेत. या निर्णयाचे पालन करणे महापालिका व होर्डिंगधारकांना बंधनकारक आहे. त्यामुळे नुकतीच सर्व होर्डिंगधारकांची तत्काळ बैठक घेण्यात आली. त्यात न्यायालयाच्या निर्णयाची सविस्तर माहिती संबंधितांना देण्यात आली आहे. यापुढील संपूर्ण कार्यवाही ही न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येईल.**
> **– जितेंद्र वाघ, अतिरिक्त आयुक्त.**

# निगडीतील त्या जागेसाठी 'पीएमआरडीए' समोर 'हलगी बजाओ' आंदोलन



।मावळ ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**'पीएमआरडीए'ची जागा बिल्डराच्या घशात न घालता विकलेला भूखंड परत घ्यावा. तसेच त्या जागेवर शिवसृष्टी उभारण्यात यावी, अशी मागणी करत पीएमआरडीए कार्यालयासमोर भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव – समितीकडून बुधवार (दि.३) हलगी बजाओ आंदोलन करण्यात आले.**

निगडीतील पेठ क्र.२४ व सर्व्हे नं.१२, १३ व १४ येथील जागेसंदर्भात बांधकाम व्यावसायिकांमध्ये झालेले सर्व व्यवहार रद्द करण्यात यावेत. या जागेत राज्य सरकार, महापालिका व पीएमआरडीएने छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारित शिवसृष्टी उभारण्यात यावी. या जागेवर पालिकेच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात यावी. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सवही या जागेवर करण्यात यावा.

भक्ती शक्ती शिल्प समूहासमोर मेट्रो स्टेशन होणार असल्यामुळे अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा स्थलांतर न करता याच जागेत बसविण्यात यावा. मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती कार्यक्रमासाठी या जागेचा वापर करण्यात यावा. या जागेवर कुस्त्या, गावजत्रेचे कार्यक्रम होतात, अशी मागणी आंदोलनावेळी करण्यात आली. आंदोलनावेळी मारुती भापकर, मानव कांबळे, सतीश काळे, काशीनाथ नखाते, भाऊसाहेब अडागळे, युवराज कोकाटे, गणेश भांडवलकर, आलम शेख, संतोष इंगळे, आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'लेन कटिंग'च्या नियमांची कठोर अंमलबजावणी व्हावी!

## खासदार श्रीरंग बारणे यांची सूचना : अधिका-यांसह केली 'एक्सप्रेस वे'ची पाहणी

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील उर्से टोलनाक्यापासून यापुढे जड वाहने आणि पर्यटन गाड्यांना लेन कटिंग करु देवू नये. वाहतूक विभागाच्या पोलिसांनी रस्त्यावर उभे राहून संचलन करावे. ८ दिवसात दिशादर्शक फलक, बॅरिकेट्स, रस्ते दुरुस्त करण्याच्या सूचना मावळचे शिवसेना खासदार, केंद्र सरकारच्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष श्रीरंग बारणे यांनी अधिका-यांना दिल्या.**



पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने खासदार बारणे यांनी संबंधित अधिका-यांची आज (गुरुवारी) बैठक घेतली. त्यानंतर महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट', खंडाळा येथील रस्त्याची अधिका-यांसह प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली. उपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. वाहतूक विभागाचे पोलीस उपअधिक्षक तानाजी चिखले, एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता सुर्ती नाईक, राकेश सोनवणे, पीडब्ल्यूडीचे उपअभियंता धनराज दराडे, एनएचआयचे कार्यकारी अभियंता यशवंत घोटकर, आरआयबीचे जयंत डांगरे, मावळचे तहसीलदार विक्रम देशमुख, लोणावळ्याचे मुख्याधिकारी पंडीत पाटील, माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव, श्रीधर पुजारी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुका प्रमुख राजेश खांडभोर, सुर्यकांत वाघमारे, निलेश तरस ,विशाल हुलावळे, मुन्ना मोरे उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, महामार्गावर सातत्याने होणारे अपघात चिंताजनक आहेत. त्यासाठी तातडीने उपाययोजना हाती घेतल्या आहेत. बस दरीत पडली होती. तिथे कठडा बसविण्यात आला आहे. मोठी वाहने जाऊ नयेत यासाठी बूम बसविले आहेत. यापुढे टोलनाक्यापासून जड वाहने आणि पर्यटन गाड्यांना लेन कटिंग करु देवू नये. वाहतूक विभागाच्या पोलिसांनी रस्त्यावर उभे राहून संचलन करावे. जेणेकरुन वाहनचालकांना शिस्त लागेल. अर्धवट कामे येत्या ८ दिवसात पूर्ण कराव्यात. दिशादर्शक फलक, बॅरिकेट्स, रस्ते दुरुस्त करावेत.

> महामार्गावर टनेलमध्ये वीजेची सोय नाही. तिथे वीज दिवे बसवावेत. अपघात टाळण्यासाठी प्रयत्न केले जातील. जड वाहतूक करणाऱ्या ट्रकने लेन कटिंग केल्यास दंड आकारण्यात यावा. घाटात अधिकचे कर्मचारी वाढवावेत. ज्या ठिकाणी ब्लॅक स्पॉट निश्चित केले आहेत. त्या जागेवर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना अधिका-यांना दिल्या आहेत.
> **- श्रीरंग बारणे**, खासदार.

# बाजार समित्यांची सूत्रे प्रामाणिक हातात द्या



भूमिका

वऱ्हाडातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांचा टप्पा आजपासून सुरु झाला आहे. पहिल्या टप्प्याचे मतदान आटोपल्यावर आता रविवारी दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान होऊन बाजार समित्या नेमक्या कोणाच्या हातात द्यायच्या याचा निर्णय शेतकरी घेणार आहेत. गेली अनेक वर्ष सहकार क्षेत्राचा बट्याबोळ करून तेच कथित सहकार नेते पुन्हा बाजार समिती आपल्या राजकारणाचा कायम अड्डा राहावा यासाठी जिवाच्या आकांताने भिडले आहेत. गेल्या पन्नास वर्षात अपवाद वगळता वऱ्हाडातील बहुसंख्य बाजार समित्या संचालकांच्या खाबुगिरी मुळे आर्थिक संकटात सापडल्या आहेत. दलाल,अडते आणि संचालकांच्या संगनमताने शेतकऱ्यांची लूट होत आहे. शेतमालाच्या भावाला पर्याय देणाऱ्या इतर यंत्रणा आणि खासगी बाजार समित्यांना अलीकडे सरकारने परवानगी दिल्यावर कारभार सुधारून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे मोठे आव्हान बाजार समित्यांच्या पुढे उभे असताना ह्या निवडणुकांना सामोरे जावे लागत आहे.

सहकाराचा उगम ज्या पश्चिम महाराष्ट्रातून झाला त्या भागात अनेक ठिकाणी सहकाराने उत्तम कामगिरी करून कायापालट करून दाखविला आहे. बँकिंग,उद्योग,दूध उत्पादन,शेती,साखर उद्योग,सूतगिरणी अश्या अनेक क्षेत्रात सहकाराची ताकद आणि क्षमता काय असते हे त्या भागातील लोकांनी दाखवून दिले आहे. अनेकांनी समान उद्देशाने एकत्र येऊन आपला पर्यायाने समाजाचा विकास घडवून आणणे हा सहकाराचा प्रमुख उद्देश आहे. एकटा कुणी काहीच करू शकत नाही जेव्हा सामूहिक नेतृत्व तयार होते आणि एखाद्या कार्याला असंख्य हात लागतात तेव्हा ते काम यशस्वी होते. सहकाराच्या माध्यमातून एखादे झाड लावले तर त्याची फळे खाण्याची भावना नंतरच्या पिढ्यात असते मात्र विदर्भात सहकाराचा वृक्ष लावताना तोच मोडून खाण्याची घाणेरडी सवय अनेकांना लागल्यामुळे या भागात सहकार मूळ धरू शकला नाही. सहकाराचा स्वाहाकार करण्यात अनेक आघाडीवर आहेत.

वऱ्हाडातील सहकाराला अपहार आणि स्वार्थाची मोठी कीड गेल्या काही वर्षात लागलेली आहे त्यामुळे सहकारी संस्था मग त्या कोणत्याही क्षेत्रातील असो धडाधड बंद पडतात किंवा तोट्यात तरी जातात असा गेल्या पाच सहा दशकांचा अनुभव आहे." चार जणांची माय अन खाटल्यावर जीव जाय " अशी एक वऱ्हाडी म्हण आहे त्याप्रमाणे सध्या आपल्या भागातील सहकारी संस्थांची स्थिती झालेली आहे. कुण्या एकावर दायित्व नसल्याने कुणी कसेही वापरा आणि सोडून द्या अशी सहकारी संस्थांची वाईट अवस्था गेल्या काही काळापासून झाल्याने लोकांचा सुद्धा सहकारी संस्थांवरील भरवसा डगमगायला सुरुवात झाली आहे. सहकाराच्या बळावर गेल्या काही वर्षात प्रत्येक तालुक्यात एक सहकार महर्षी तयार झाला आहे त्याने कार्यकर्ते पोसण्यासाठी सहकारी संस्थांचा वापर केल्यामुळे सामान्य लोक या सहकारापासून चार हात दूर राहायला लागले आहेत.

खरेदी विक्री संघ,बाजार समिती,जिनिंग संस्था दूध संघ ,बँका किंवा अन्य सहकारी संस्था जणू आपल्या व्यक्तिगत मालकीच्या असल्याच्या थाटात हे गल्लीतले सहकार नेते वागायला लागल्याने कार्यकर्त्यांच्या साग्रसंगीत पार्ट्यांना लागणारी ओली,सुकी सामुग्री सहकाराच्या गंगाजळीतुन खर्च करण्याचा सपाटा सुरु झाला. काही वर्षात सहकारी संस्थांचे पोट खपाटीला गेले मात्र सहकार नेत्यांच्या ढेऱ्यांचा घेर वाढत राहिला. इतर सगळ्या निवडणुका लढण्यासाठी सहकार आणि त्याची गंगाजळी हा ज्यांना प्रमुख स्रोत वाटतो त्यांनी आपल्या भागात सहकाराचे वाटोळे केले आहे. पश्चिम किंवा उत्तर महाराष्ट्रात बाजार समित्यांचे कारभार आणि ते शेतकऱ्यांना देत असलेल्या सुविधा आणि सेवा बघता आपल्याकडे त्या तुलनेत काहीही केले जात नाही. घामातून पिकवलेला शेतमाल शेतकरी जेव्हा बाजार यार्डात नेतो तेव्हा दलाल लचके तोडायला पुढे येतात त्याची फिर्याद देण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याला धड ग्लासभर पाणीही विचारले जात नाही अशी बाजार समित्यांची अवस्था आहे.

बऱ्याच काळानंतर बाजार समिती निवडणुका होत आहेत त्यामुळे ज्यांनी शेतकऱ्यांच्या मरणाची तयारी करण्यासाठी सहकार नावाचे गालिचे अंथरून ठेवले आहेत त्या सहकारातल्या घुशींना मतांचे औषध फवारून नेस्तनाबूत करण्याची वेळ आली आहे. बोकडाचे गावभोजन आणि वारुणीचा आस्वाद देऊन कुणालाही विकत घेता येऊ शकते असा गैरसमज झालेल्या कथित सहकार नेत्यांना वठणीवर आणण्याचा आणि आपली बाजार समिती वाचविण्याचा हाच योग्य काळ आहे याची जाणीव ठेवून ज्यांचे रविवारी मतदान आहे त्या मतदारांनीएक धक्का देऊन सहकारात शिरलेली ही घाण उपसली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना जी असंख्य कारणे आहेत त्यात आपल्याच माणसांकडून होणारा विश्वासघात हे एक मोठे कारण आहे. ते उद्याच्या बाजार समितीच्या फलकावरून पुसून टाकण्याची यापेक्षा चांगली संधी नाही ,म्हणून खरे सहकारी आणि सहकार ओळखा अन निर्णय घ्या.

## संपादकीय »

### कर्नाटकातील उधळण

***भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस यांच्यात कर्नाटकात सुरू असलेल्या अटीतटीच्या झुंजीचा फैसला आजपासून बरोबर आठ दिवसांनी म्हणजे पुढच्या बुधवारी होणार आहे.***

या पार्श्वभूमीवर या दोन्ही पक्षांनी अखेरीस आपापले जाहीरनामे प्रसिद्ध केले असून, त्यांत मतदारांवर आश्वासनांची प्रचंड खैरात करण्यात आली असून शिवाय अनेक महत्त्वाचे मुद्देही प्रचाराच्या आखाड्यात उभे ठाकले आहेत. काश्मीरला विशेष दर्जा देणारे भारतीय राज्यघटनेतील कलम ३७० रद्द करणे तसेच अयोध्येत राममंदिर उभारणे, या दोन्हींचा फैसला करण्यात यश आल्यानंतर आता भाजपने आपल्या भात्यातील अखेरचा रामबाण बाहेर काढला आहे. तो म्हणजे 'समान नागरी कायदा'. गेल्या वर्षी गुजरातेत झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरही हाच विषय भाजपने चर्चेत आणला होता. त्याचबरोबर नागरिकत्व नोंदणी कायदा (एनआरसी) लागू करण्याचे आश्वासनही भाजपच्या जाहीरनाम्यात आहे.

**आपल्या मनातील माझ्यावर वयाच्या तेविसाव्या वर्षी 'अंधशाळे'ची धुरा सोपवण्यात आली होती. त्यामुळे समाजातील अंध व्यक्तींचं, मुला-मुलींचं समाजातील अज्ञान, आर्थिक क्षमता वगैरेंशी माझा संबंध यायला लागला. अंधत्व का येतं आणि आलं तर काय करायला हवं याची आपोआपच प्रश्नोत्तरं समोर यायला लागली.**

## आपण काय करतो?



यानंतर सुमारे पाच वर्षांनी शंतनुराव किर्लोस्करांनी माझी 'किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लिमिटेड' या कंपनीवर संचालक म्हणून नियुक्ती केली. यामुळे किर्लोस्करांशी वैयक्तिक ऋणानुबंध तर वाढलेच, शिवाय खूप शिकायलाही मिळालं. या कंपनीच्या होणाऱ्या सभा, अनेकदा त्यांच्याकडे काही उद्योजक किंवा तत्सम उच्चविद्याविभूषित लोक आले की आम्हा उभयतांनाही बोलावलं जायचं.

अनेकदा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक बाबींविषयी चर्चा होत. शिक्षणाबद्दल सार्वत्रिक नाराजी व्यक्त केली जायची. शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्यांची पदवीधर झाल्यावर असलेली क्षमता, उपयुक्तता यावर भरपूर टीका होत असे. मी पिलानीतून शिकल्यामुळे माझी परिस्थिती त्यामानानं चांगली होती. कारण, पदवीधर होईपर्यंत आम्हा पिलानीकरांना चार उद्योगक्षेत्रांत घेतलेल्या प्रशिक्षणाचं पाठबळ होतं. महाराष्ट्रात असं कुठंही नव्हतं. पदवीधराला नोकरीवर घ्यायचं व नंतर वर्ष-सहा महिने प्रशिक्षण द्यायचं; मगच तो औद्योगिक संस्थेत काम करण्याच्या पात्रतेचा होत असे. अशा टीका होई, तेव्हा माझ्या मनात विचार येत असे की, हे मान्य आहे; परंतु ते सुधारण्यासाठी आपण काय करतो?

गरजू, गरीब विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी डॉ. अच्युतराव आपटे यांनी 'विद्यार्थी सहाय्यक समिती' स्थापन केली. अनाथ मुलं आणि महिला यांच्या पुनर्वसनासाठी बाबासाहेब जाधव यांनी 'बालग्राम' सुरू केलं. झोपडपट्टीतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी किशाभाऊ पटवर्धन यांनी 'स्वरूपवर्धिनी' सुरू केली. या सर्व संस्थांशी माझी नाळ जोडली गेली होती. 'बालकल्याण' संस्था - जी सुमारे पाच हजार अपंग विद्यार्थ्यांना मदत करते - तिथंही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याबरोबरच पालक, शिक्षक यांचंही प्रशिक्षण आम्ही महाराष्ट्रभर केलं. ते या मुलांच्या सामाजिक आणि भावनिक दृष्टीनं महत्त्वाचं होतं. घरातील अपंग मूल म्हणजे देवाचा कोप किंवा शाप अशी समजूत होती. 'सकाळ'मध्येही अशा सामाजिक विचारांवर काम करणारे अनेक न्यास आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सत्तासंघर्षाचा निकाल लवकरच!

## 8 ते 12 मे या कालावधीत सत्तासंघर्षाचा निकाल जाहीर होण्याची शक्यता

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या निकालाची प्रतिक्षा अनेक दिवसांपासून आहे. मात्र, हा निकाल आता लवकरच येणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणावर प्रदीर्घ सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल राखीव ठेवला आहे. मात्र, आता निकालाची प्रतिक्षा लवकरच संपणार आहे.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासाठी आता केवळ चार ते पाच तारखाच उरल्या आहेत. 8 ते 12 मे या कालावधीत सत्तासंघर्षाचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याच तारखांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. तसेच कायदेतज्ज्ञांच्या वर्तुळातही हीच चर्चा आहे.

ज्या घटनापीठासमोर महाराष्ट्राच्या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यातील एक न्यायमूर्ती एम. आर. शाह हे 15 मे रोजी निवृत्त होणार आहेत. त्यामुळे निकाल त्याच्याआधीच येणार आहे. त्यामुळे हा निकाल १५ मेच्या आधी येणार असल्याचे सांगितले जात आहे. 13 आणि 14 मे रोजी शनिवार आहे. त्यामुळे 8 ते 12 या तारखांमध्ये कोणत्यादी दिवशी निकालाची शक्यता आहे.



शिवसेनेच्या फुटीनंतर महाराष्ट्रात अनेक घडामोडी घडल्या आहेत. जवळपास २६ जून २०२२ पासून या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे. सुरुवातीला सुट्टीकालीन दोन न्यायामूर्तींच्या समोर सुनावणी झाली. त्यानंतर माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा यांच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे आणि नंतर पाच न्यायामूर्तींच्या घटनापीठासमोर ही सुनावणी झाली.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड) यांच्या अध्यक्षतेखाली पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर 14 फेब्रुवारी ते 16 मार्च सलग सुनावणी झाली. तेव्हापासून हा निकाल राखीव आहे. ज्या घटनापीठाला सत्तासंघर्षाचा निकाल द्यायचा आहे. त्या घटनापीठासमोर दोन निकाल प्रलंबित आहेत. एक महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा आहे. दुसरा दिल्ली आणि केंद्र सरकारमधल्या अधिकारांच्या वादाचा आहे. दिल्ली आणि केंद्र सरकारचे प्रकरणाचा निकाल 17 जानेवारीपासून प्रलंबित आहे.

### 11 आणि 12 मे या दोन तारखा अधीक महत्वाच्या

**सध्या कर्नाटकमध्ये विधानसभेच्या निवडणुका सुरु आहेत. 10 मेला मतदान आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल कर्नाटकच्या मतदानानंतर येतो का याची उत्सुकता आहे. तसे झाले तर 11 आणि 12 मे या दोन तारखा अधीक महत्वाच्या ठरतात, अशी चर्चा आहे.**

# मुख्यमंत्री शिंदे राज्यपालांच्या भेटीला

## राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण


। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यपाल रमेश बैस यांच्या भेटीसाठी राजभवनावर दाखल झाले आहेत. एकनाथ शिंदे यांची ही नियोजित भेट नसल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री अचानक राज्यपालांच्या भेटीला गेल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. शिंदे यांनी अचाण भेट घेतल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजकारणात सध्या पडद्यामागे अनेक घडामोडी घडत आहेत. या घडामोडींदरम्यान एकनाथ शिंदे आणि राज्यपाल रमेश बैस यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. या भेटीमागचे कारण समोर आलेले नाही. मात्र, भेटीचे वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्यपाल रमेश बैस यांच्यात बैठक होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. याबाबत कोणतीही अधिकृत अशी माहिती समोर आलेली नाही. मात्र, अचाण घेतलेल्या या भेटीमुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. राज्यातील सत्तासंघर्षाचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल कधीही जाहीर होऊ शकतो. या निकालाच्या पार्श्वभूमीवर ही भेट असल्याची चर्चा आहे.

एकनाथ शिंदे व राज्यपाल रमेश बैस यांची ही पहिलीच भेट आहे. राज्यात सत्तांतर झाले त्यावेळी भगतसिंह कोश्यारी हे राज्यपाल होते. दरम्यान, रमेश बैस यांची राज्यपालपदी नियुक्ति करण्यात आली. राजभवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्नेह भोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.





### बैठकीत राजकीय चर्चा नाही

**दरम्यान, केंद्रीय कायदेमंत्री किरण रिजिजू आणि महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यात मुंबईत बंद दाराआड चर्चा झाली. त्यानंतर एकनाथ शिंदे हे राज्यपालांच्या भेटीला गेल्यामुळे अधिक चर्चा होत आहेत. अर्थात या बैठकीत राजकीय चर्चा झाली नसल्याचे नार्वेकर यांनी सांगितले होते.**

# हसन मुश्रीफांच्या मुलांना १ जूनपर्यंत दिलासा; कोर्टात काय झालं?

। नाशिक।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रवादी काँग्रसचे नेते हसन मुश्रीफ यांच्या तीनही मुलांना १ जून पर्यंत मुंबई सत्र न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. पुढील निर्णयापर्यंत त्यांना अटक न करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे मुश्रीफांच्या मुलांना १ जूनपर्यंत अटकेपासून संरक्षण मिळाले आहे.

इडीने दाखल केलेल्या प्रकरणाविरोधात मुश्रीफांच्या मुलांनी मुंबई सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिन्यासाठी अर्ज दाखल केला आहे. या अर्जावरील पुढची सुनावणी १ जूनपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. तो पर्यंत तिघांनाही अटकेपासून दिलेले संरक्षण कायम असणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, आमदार हसन मुश्रीफ (HASAN MUSHRIF) यांची मनी लॉंड्रींगप्रकरणी 'ईडी'ची कारवाई सुरू आहे. याच प्रकरणात त्यांच्या तीनही मुलांवर गुन्हा दाखल आहे. आमदार मुश्रीफांचा जामीन अर्ज फेटाळल्याने त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. दरम्यान, आज त्याच न्यायालयाने मुश्रीफांच्या तीनही मुलांना पुन्हा तात्पुरता दिलासा दिला आहे.

आमदार हसन मुश्रीफ यांच्यावर मनी लॉंड्रींगप्रकरणी 'ईडी'ने खटला दाखल केला आहे. याच प्रकरणात साजीद, आवेद आणि नावेद या त्यांच्या मुलांचाही समावेश असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्याविरोधात या मुश्रीफ पिता-पुत्रांनी जामीन अर्ज केला आहे.

दरम्यान, मुश्रीफांच्या तीन मुलांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी पूर्ण झालेली आहे. मात्र युक्तीवाद सुरू आहे. हा युक्तीवाद १२ एप्रिल रोजी होणार होता. त्यावेळी तो तहकूब करून त्यासाठी तारीख २० एप्रिल देण्यात आली. त्या दिवशीही युक्तीवाद झाला नाही. तो ४ मे रोजी होणार होता. मात्र ४ मे राजीही सत्र न्यायालयाने सुनावण तहकूब केली. आता १ जून रोजी मुलांच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे. तोपर्यंत या तिघांनाही 'पीएमएलए' कोर्टाने अटकेपासून दिलेले संरक्षण या कोर्टानेही कायम ठेवले आहे.

# मणिपूरमध्ये शूट अॅट साईटची ऑर्डर!

## राज्यपालांचा मोठा निर्णय



।प्रयागराज महाईन्यूज।

**मैतई समाजाला आदिवासी समाजात घेण्याच्या निर्णयावरून मणिपूरमध्ये मोठा हिंसाचार झाला आहे. आसाम रायफल्स आणि लष्कराच्या तुकड्या येथे तैनात करण्यात आल्या आहेत. परंतु, तरीही संभाव्य परिस्थिती लक्षात घेता मणिपूरचे राज्यपाल अनुसुया उके यांनी संबंधित यंत्रणांना शूट अॅट साईटची ऑर्डर दिली आहे.मणिपूर उच्च न्यायालयाने १९ एप्रिलला एका आदेशाद्वारे मैतई समुदायाचा अनुसूचित जातीत समावेश करण्याचे निर्देश दिले.**

त्याला राज्यातील नागा तसेच कुकी या समुदायांनी आक्षेप घेतला आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी बुधवारी ऑल ट्रायबल स्टुडंट युनियन मणिपूर यांनी विष्णूनगर तसेच चुराचांदपूर जिल्ह्यात मोर्चा आयोजित केला होता. यात मोठ्या संख्येने युवक सामील झाले होते. त्यावेळी विष्णूपूर जिल्ह्यातील नागरिकांच्या गटाशी मोर्चेकऱ्यांची चकमक उडाली त्यातून एका समुदायाची घरे जाळण्यात आली. राजधानी इंफाळसह राज्यभर या हिंसेचे लोण पसरले. अखेर लष्कराला पाचारण करण्यात आले. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी या मुद्द्यावर चर्चेतून मार्ग काढण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, हिंसाचार वाढत जास असल्याने मणिपूर राज्यपालांनी शूट अॅट साईटची ऑर्डर दिली आहे. ज्यावेळी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाते, आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नसतात त्यावेळी शूट अॅट साईटची ऑर्डर दिली जाते. म्हणजेच, दंगलखोर दिसले की त्यांच्यावर जागीच गोळीबार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### मैतेई समुदायाची मागणी काय?

इंफाळ खोऱ्यात मैतेई समुदायाचे प्राबल्य आहे. म्यानमार तसेच बांगलादेशमधून घुसखोरी मोठ्या प्रमाणात होत असल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते असे मैतेई समुदायाचे म्हणणे आहे. त्या तुलनेत टेकड्यांच्या परिसरात राहणाऱ्या नागा तसेच कुकी यांना विविध कायद्यांनी संरक्षण आहे. त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करणे अशक्य आहे. राज्यातील ९० टक्के भाग टेकड्यांचा आहे. तर बाहेरील नागरिकांनी आमच्या वडिलोपार्जित जमिनींवर कब्जा केल्याचा दावा त्यापासून संरक्षणासाठी अनुसूचित जमातीत समावेशाची मागणी मैतेईंची आहे. सध्याच्या कायद्यानुसार टेकडी भागात त्यांना कायमचे वास्तव्य करता येत नाही. शेड्यूल्ड ट्राईब डिमांड कमिटीने मैतेईंचे हे आंदोलन सुरू केले. केवळ नोकऱ्यांमधील आरक्षणासाठी ही चळवळ नसून, आमची जमीन तसेच संस्कृती वाचवण्यासाठी हा एल्गार आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

## बजरंग दलावर बंदीची मागणी म्हणजे देशद्रोह्यांना साथ; देवेंद्र फडणवीस

।बंगळूर। महाईन्यूज ।

बजरंग दलासारख्या राष्ट्रभक्त संघटनेवर बंदीची मागणी करणं म्हणजे एक प्रकारे देशद्रोह्यांनाच साथ देण्यासारखे आहे, असं वक्तव्य महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. बेळगावात पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरं देत असताना त्यांना याविषयीचा प्रश्न विचारण्यात आला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी हे उत्तर दिलं आहे.

काय म्हणाले देवेंद्र फडणवीस ?भाजपा हा राष्ट्रीय पक्ष आहे. यापूर्वीही लोकसभेच्या निवडणुकीत मी बेळगावात प्रचारासाठी आलो होतो. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना कर्नाटकात प्रभारी होते. तेदेखील सर्वत्र फिरले आहेत. मी स्वत: मराठी भाषिकांच्या मागे उभा आहे आणि आमचा पक्ष सुद्धा ठामपणे उभा आहे. संजय राऊतांनी काँग्रेसची दलाली करणे सोडले, तर मला कर्नाटकात जाण्याची गरज पडली नसती. संजय राऊत यांच्या गटाचा काँग्रेस



हा मित्रपक्ष आहे. त्यांनी आपल्या मित्रपक्षाला प्रचार कुठे करा आणि कुठे करु नका, याबाबत सांगितले नाही. कारण, ते येथे काँग्रेसची दलाली करण्यासाठी आले होते, असेही फडणवीस म्हणाले. बेळगावसह कर्नाटकात कमळ फुललेले दिसेल

बेळगावातील प्रचार सभांमध्ये बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बेळगावात आणि कर्नाटकातही कमळच फुललेले दिसेल. गेल्या ९ वर्षांत देशात मोठे परिवर्तन झाले आहे. गरिबांसाठी दिल्लीतून जाणारा प्रत्येक पैसा पूर्णपणे गरिबांच्या खात्यात जात आहे. दलाली आणि मध्यस्थांची संपूर्ण यंत्रणा संपविण्याचे काम मोदीजींनी केले.

## “माझ्या धगधगत्या मणिपूरला वाचवा,”

### मेरी कोमवर भावनिक साद घालण्याची वेळ का आली?

।पणजी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ऑलिंपिक पदक विजेती बॉक्सर आणि राज्यसभा खासदार मेरी कोमने बहुसंख्य मैतेई समाजाचा अनुसूचित जमाती (एस. टी.) वर्गात समावेश करण्यावरून तिच्या गृहराज्य मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होत आहे. यासाठी तिने देशाला मदतीसाठी आवाहन केले आहे. मेरी कोमनेही लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. 'एएनआय' या वृत्तसंस्थेशी बोलताना ती म्हणाली, “मला मणिपूरमधील वातावरण चांगले वाटत नाही. काल रात्रीपासून परिस्थिती बिकट झाली आहे. मी राज्य आणि केंद्र सरकारला या परिस्थितीवर पावले उचलण्याचे आणि राज्यात शांतता, सुरक्षा राखण्याचे आवाहन करते. मेरी कोमने रात्री एक ट्वीट करून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मदत मागितली होती.**




एम. सी. मेरी कोम म्हणाली, “मणिपूरमधील परिस्थिती माझ्या मनाला दुःखी करीत आहे. यापूर्वी मी असा हिंसाचार कधीही पाहिला नाही आणि तशी कल्पनाही करू शकत नाही. काल रात्रीपासून राज्यातील परिस्थिती आणखी वाईट झाली आहे.” मेरी कोमने राज्य आणि केंद्राला एकत्र काम करण्याचे आवाहन करीत म्हटले आहे की, “मी राज्य आणि केंद्र सरकारला लवकरात लवकर पावले उचलण्यास सांगत आहे, शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी जनतेला देखील विनंती करीत आहे.” ऑलिंपिक पदक विजेती बॉक्सर आणि राज्यसभा खासदार मेरी कोमने बहुसंख्य मैतेई समाजाचा अनुसूचित जमाती (एस. टी.) वर्गात समावेश करण्यावरून तिच्या गृहराज्य मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होत आहे. यासाठी तिने देशाला मदतीसाठी आवाहन केले आहे.

मेरी कोमनेही लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. 'एएनआय' या वृत्तसंस्थेशी बोलताना ती म्हणाली, “मला मणिपूरमधील वातावरण चांगले वाटत नाही. काल रात्रीपासून परिस्थिती बिकट झाली आहे. मी राज्य आणि केंद्र सरकारला या परिस्थितीवर पावले उचलण्याचे आणि राज्यात शांतता, सुरक्षा राखण्याचे आवाहन करते. मेरी कोमने रात्री एक ट्वीट करून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मदत मागितली होती. मैतेई समाजाचाचा (जे राज्याच्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे आहे) एस.टी. प्रवर्गात समाविष्ट झाल्यानंतर हिंसाचाराचा भडका उडाला. या निर्णयाला इतर समाजाने याच कारणास्तव आव्हान दिले आहे. ते त्यांना सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश नाकारतील असेही ते म्हणाले. राज्याच्या लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के आदिवासी (नागा आणि कुकीसह) आहेत.

मैतेई समाजाचा अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी चुराचंदपूर जिल्ह्यातील तोरबांग भागात विद्यार्थी संघटनेने 'आदिवासी एकता मार्च' काढला तेव्हा हिंसाचार झाला. राज्यातील सर्व दहा जिल्ह्यांमध्ये अनेक निषेध मोर्चे आणि कार्यक्रमात हजारो लोक सहभागी झाले होते. पोलिसांनी या घटनेनंतर 'असामाजिक घटकांवर' सोशल मीडियाचा गैरवापर, प्रतिमा आणि द्वेषपूर्ण भाषणे, तसेच व्हिडिओ शेअर केल्याचा आरोप केला आहे.

# बहुचर्चित '8AM मेट्रो' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित!

'8AM मेट्रो' चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर चर्चा सुरू होती. आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला असून याचे दिग्दर्शन राज राचकोंडा यांनी केले आहे. हा चित्रपट दैनंदिन जीवनाशी निगडित अर्थात ह्यूमन कनेक्शनवर आधारित आहे, असे आपल्याला ट्रेलर पाहून समजते. गुलशन देवैया आणि सयामी खेर हे दोन कलाकार या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणार आहेत. यांच्यासह मराठी अभिनेता उमेश कामतसुद्धा '8AM मेट्रो' चित्रपटात प्रेक्षकांना महत्त्वाच्या भूमिकेत दिसेल.उमेश कामतने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून '8AM मेट्रो' चित्रपटाचा ट्रेलर शेअर केला आहे. "'8AM मेट्रो' या चित्रपटाच्या संपूर्ण टीमसोबत विशेषत: गुलशन देवैया,



सयामी खेर आणि दिग्दर्शक राज राचकोंडा


यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव छान

होता," असे उमेशने कॅप्शनमध्ये नमूद केले आहे.

'8AM मेट्रो' या चित्रपटात दोन अनोळखी व्यक्तींची कथा मांडण्यात आली आहे. या दोघांची पहिली भेट ८ वाजता सुटणाऱ्या मेट्रोमध्ये होते आणि दोघेही एकाच मेट्रो डब्यातून प्रवास करीत असतात. सुरुवातीला दोघे अनोळखी असतात परंतु कालांतराने त्यांच्यात कशी मैत्री होते आणि पुढे कौटुंबिक जबाबदारीचे काय? या विषयावर हा संपूर्ण चित्रपट आधारलेला आहे, असे ट्रेलरमधून स्पष्ट होते. अभिनेता उमेश कामत यात नायिकेच्या पतीची भूमिका साकारणार आहे.

'8AM मेट्रो' १९ मे २०२३ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून सिनेमात तुम्हाला कवी गुलजार यांच्या कवितासुद्धा ऐकायला मिळतील.

## 'दंगल' अभिनेत्री सान्या मल्होत्राने खरेदी केले नवीन घर

2016 मध्ये आमिर खानच्या दंगल या चित्रपटातून आपल्या फिल्मी करिअरची सुरुवात करणारी सान्या मल्होत्रा आता अनेकदा चर्चेचा भाग असते. सध्या सान्या तिच्या नवीन घरामुळे चर्चेत आहे. तिने नवीन घर घेतले आहे.

सान्या मल्होत्राने नवीन घरात गृहप्रवेशही केला आहे. यावेळी तिने पूजा केली. आता गृहप्रवेश पूजेचे अनेक फोटो समोर आले आहेत, जे सान्यानेच चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. यादरम्यान अभिनेत्री अतिशय सुंदर लूकमध्ये दिसली.

सान्याने स्टोरीमध्ये स्वतःचा एक फोटो देखील शेअर केला आहे, ज्यामध्ये ती डोक्यावर कलश घेऊन घरात प्रवेश करताना दिसत आहे. हाऊस वॉर्मिंग समारंभासाठी अभिनेत्रीने एक सुंदर आऊटफिट निवडला, ती प्रिंटेड ब्लाउजसह पांढरी साडी नेसलेली दिसत आहे. हा फोटो शेअर करत तिने 'नवीन घर' असे कॅप्शन दिले आहे.

या फोटोंशिवाय पूजेदरम्यानचे अनेक फोटो तिने चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. शेअर केलेल्या या फोटोंमध्ये घरात एका ठिकाणी भगवान शंकराची मूर्तीही बसवलेली दिसत आहे. याआधी 2021 मध्ये सान्याने जुहूमध्ये सुमारे 14 कोटी रुपयांचे घर खरेदी केले होते. त्या काळातही ती खूप चर्चेत होती. मात्र, अभिनेत्रीच्या या नवीन घराच्या किमतीची माहिती अद्याप समोर आलेली नाही.



## गायकवाड कुटूंबियांचे काय होणार?

: ओटीटी मनोरंजन विश्वामध्ये ज्या मालिकेनं प्रचंड लोकप्रियता मिळवली त्यामध्ये अतुल कुलकर्णी, सचिन खेडेकर आणि प्रिया बापट यांच्या सीटी ऑफ ड्रीम्सचे नाव घ्यावे लागेल. या वेबसीरिजच्या यापूर्वीच्या दोन्ही सीझनला प्रेक्षकांचा



ठा प्रतिसाद मिळाला होता. आता त्याचा तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.गेल्या दोन सीझननंतर चाहत्यांना तिसऱ्या सीझनचे वेध लागले होते. डिझनी प्लस हॉटस्टार वर लोकप्रिय मालिका म्हणून सिटी ऑफ ड्रीम्स नेहमीच ट्रेंडिंगचा विषय राहिली आहे. अशावेळी या मालिकेच्या तिसऱ्या सीझनच्या घोषणेनंतर चाहत्यांनी त्याला प्रतिसाद दिला आहे. मेकर्सनं तिसऱ्या सिझनची घोषणा केली असून नव्या सीझनमधून आता पुन्हा गायकवाड कुटूंबियामध्ये काय होणार याची उत्सुकता आहे.

## दिव्यांका त्रिपाठी होणार आई?

टीव्ही अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठीची फॅन फॉलोइंग खूप मोठी आहे. चाहत्यांसाठी ती अजूनही 'बनू में तेरी दुल्हन'ची विद्या आणि 'ये है मोहब्बतें'ची इशिता भल्ला आहे. तिच्या शो व्यतिरिक्त ती तिच्या वैयक्तिक आयुष्यात देखील चर्चेत असते. गेल्या अनेक दिवसांपासून बातम्या येत होत्या की, लवकरच दिव्यांकाच्या घरात बाळाच्या रडण्याचा आवाज येणार आहे. ती गरोदर आहे. मात्र आता तिचा पती विवेक दहियाने याविषयी सत्य सांगीतलं आहे. विवेक दहियाने इंडिया टुडेशी संवाद साधताना सांगितले की, त्याची पत्नी दिव्यांका त्रिपाठी गर्भवती नाही. असे काही घडले तर ही आनंदाची बातमी चाहत्यांना नक्कीच सांगेन असेही तो म्हणाला.

विवेक म्हणाला, 'मला समजत नाही की हे आमच्यासोबत का होत आहे. तो इंटरनेटवर अनेक वेळा येतो. पण नाही, ती गरोदर नाही. जेव्हा हे घडेल तेव्हा आम्ही आमच्या चाहत्यांना नक्की सांगु.अशी सुरु झाली दिव्यांकाची प्रेमकहाणी...

'ये है मोहब्बतें'च्या सेटवर दिव्यांका आणि विवेकची प्रेमकहाणी सुरू झाली. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले होते. 2016 मध्ये दिव्यांकाने विवेकसोबत तिच्या गावी भोपाळमध्ये लग्न केलं. त्यांच्या लग्नाला ६ वर्षे झाली आहेत. दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात आणि चाहत्यांना त्यांच्या आयुष्यातील चांगल्या-वाईट काळाबद्दल सांगत असतात. नुकतेच विवेकच्या बहिणीचे लग्न झाले तेव्हा दिव्यांका आणि विवेक चंदीगडमध्ये मस्ती करताना दिसले.



# बंगालपुढे हैदराबादी नवाब पडले फिके!

## कोलकाताचा पाच धावांनी थरारक विजय



। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या ४७व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी संपन्न झाला. हैदराबादच्या राजीव गांधी इंटरनॅशनल स्टेडियमवर दोन्ही संघांमधील हा सामना खेळला गेला. त्यात कोलकाताच्या वरुण चक्रवर्तीने शेवटचे जादुई षटक टाकत नाईट रायडर्सला अटीतटीच्या सामन्यात पाच धावांनी रोमांचक विजय मिळवून दिला. कोलकाताने हैदराबादच्या घरात जाऊन त्यांना मात दिली. यापराभवामुळे हैदराबादची प्ले ऑफमध्ये जाण्याची वाट बिकट झाली आहे.**

कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबादला शेवटच्या षटकात नऊ धावा कराव्या लागल्या. अशा स्थितीत नितीश राणाने फिरकीपटू वरुण चक्रवर्तीला गोलंदाजीसाठी बोलावले. त्याच्यासमोर अब्दुल समद आणि भुवनेश्वर कुमार हे स्फोटक फलंदाज होते. वरुणने पहिल्या दोन चेंडूंवर दोन धावा दिल्या. तिसऱ्या चेंडूवर त्याने अब्दुल समदला अनुकुल रॉयकरवी झेलबाद केले. मयंक मार्कंडे समद बाद झाल्यानंतर क्रीजवर आला. चौथ्या चेंडूवर त्याला एकही धाव करता आली नाही. पाचव्या चेंडूवर त्याने एकच धाव घेतली, स्ट्राईक भुवनेश्वर कुमारला मिळाली. सामना जिंकण्यासाठी त्याला षटकार मारायचा होता, मात्र वरुणने त्याला एकही धाव काढू दिली नाही आणि संघाला विजय मिळवून दिला. कोलकाताचा कर्णधार नितीश राणाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संघाने २० षटकांत ९ गडी गमावून १७१ धावा केल्या. प्रत्युत्तरात सनरायझर्स संघ २० षटकांत ८ गडी गमावून १६६ धावाच करू शकला. २०२० नंतर हैदराबाद आणि कोलकाता यांच्यातील हा आठवा सामना होता. कोलकाताने सहावा विजय मिळवला आहे. त्याला केवळ दोन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. या मोसमात सनरायझर्स संघ पाचव्यांदा धावत होता. त्यांना चौथ्यांदा पराभवाला सामोरे जावे लागले.

### शेवटच्या पाच षटकांत सनरायझर्सच्या तीन विकेट्स पडल्या

सनरायझर्स हैदराबादने १६ते २० षटकांमध्ये तीन विकेट गमावल्या. या कालावधीत त्याने केवळ ३२ धावा केल्या. एकेकाळी त्याला विजयासाठी ३० चेंडूत ३८ धावा करायच्या होत्या, पण संघाला हे सोपे लक्ष्य गाठता आले नाही.

१७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मयंक अग्रवाल आणि अभिषेक शर्मा यांनी हैदराबादच्या डावाला सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली, पण मयंक अग्रवाल ११ चेंडूत १८ धावा करून बाद झाला. पुढच्याच षटकात अभिषेक शर्मा ९ धावा काढून बाद झाला. विकेट पडण्याची प्रक्रिया सुरूच होती. त्यामुळे हैदराबादने ५४ धावांच्या स्कोअरवर आपले आघाडीचे चार फलंदाज गमावले आहेत. पण एडन मार्कराम आणि हेनरिक क्लासेन यांनी ५व्या विकेटसाठी ७० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत हैदराबादला सामन्यात रोखले. २० चेंडूत ३६ धावा करून क्लासेनला शार्दुल ठाकूरने बाद केले. एडन मार्करामने सहावी विकेट म्हणून ४० चेंडूत ४१ धावांची खेळी केली.

### कोलकाता नाईट रायडर्सचा डाव

» तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना कोलकाता नाईट रायडर्सने ९ गडी गमावून १७१ धावा केल्या. कोलकाताकडून रिंकू सिंगने ४६ आणि नितीश राणाने ४२ धावा केल्या. या दोघांशिवाय आंद्रे रसेलने २४ आणि जेसन रॉयने २० धावा केल्या. हैदराबादकडून टी नटराजन आणि मार्को जॅनसेनने २-२ बळी घेतले.

# पंजाब किंग्जची दाणादाण

## मुंबई इंडियन्सने IPL मध्ये रचला इतिहास

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




**मोहालिच्या बिंद्रा स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात रंगतदार सामना झाला. पंजाबने मुंबईला विजयासाठी २१५ धावांचं तगडं आव्हान दिलं होतं. परंतु, मुंबईचा सलामीवीर फलंदाज ईशान किशन आणि सूर्यकुमार यादवच्या वादळी अर्धशतकांच्या जोरावर मुंबईने १८.५ षटकात २१५ धावांचं लक्ष्य गाठलं आणि या सामन्यात मोठा विजय मिळवला. सलग दुसरा सामना जिंकून मुंबईने ९ सामन्यांपैकी ५ सामने जिंकले आहेत. परंतु, पंजाबचा पराभव करून मुंबईने या मैदानात इतिहास रचला. कारण १६ वर्षानंतर मुंबईने अशी चमकदार कामगिरी करून आयपीएलमध्ये नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे.**

आयपीएलमध्ये पाचवेळा जेतेपदावर शिक्कामोर्तब करणाऱ्या मुंबई इंडियन्सने आयपीएलमध्ये एक नवीन विक्रम केला आहे.

मुंबईने २०० हून अधिक धावांचं लक्ष्य गाठून सलग दोन सामने जिंकण्याचा खास पराक्रम केला आहे. १६ वर्षात मुंबई इंडियन्स अशी कामगिरी करणारा पहिला संघ ठरला आहे. राजस्थान रॉयल्सविरोधात ३० एप्रिलला वानखेडे मैदानात झालेल्या सामन्यात २१३ धावांचं लक्ष्य गाठून मुंबईने विजय संपादन केलं होतं. त्यानंतर काल बुधवारी झालेल्या सामन्यात मुंबईने पंजाबविरोधात २१५ धावांचा पाठलाग करत सलग दुसऱ्या विजयाला गवसणी घातली आणि आयपीएलमध्ये इतिहास रचला.मुंबईने आयपीएल करिअरमध्ये २०० हून अधिक धावांचं लक्ष्य गाठण्याची कामगिरी तीनवेळा केली आहे. यामध्ये मागील दोन सामन्यांच्या विजयाचा समावेश आहे. सलग दोन सामन्यात २०० हून अधिक धावांचा पाठलाग करून विजय संपादन करण्यात मुंबईला यश आलं. १६ वर्षात अशी चमकदार कामगिरी करणारा मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल इतिहासातील पहिला संघ ठरला आहे. इशान किशनने पंजाब किंग्जविरोधात ७५ धावा कुटल्या. तर सूर्यकुमार यादवने ६५ धावांची वादळी अर्धशतकी खेळी साकारली.

## रिंकू-नितीशची शानदार खेळी तरी दोनशे धावा करण्यात अपयश

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या ४७व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होत आहे. हैदराबादच्या राजीव गांधी इंटरनॅशनल स्टेडियमवर दोन्ही संघांमधील हा सामना खेळला जात कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना हैदराबादसमोर १७२ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. कोलकाताचा कर्णधार नितीश राणाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रिंकू सिंग आणि कर्णधार नितीश राणा यांनी मधल्या फळीत भागीदारी करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले.गोलंदाजांच्या चमकदार कामगिरीमुळे सनरायझर्स हैदराबादने कोलकाता नाईट रायडर्सला २० षटकांत १७१ धावांत रोखले. त्यांचे नऊ फलंदाज बाद झाले. हैदराबादला विजयासाठी १७२ धावा कराव्या लागतील.

कोलकाताकडून रिंकू सिंगने ४६ , कर्णधार नितीश राणाने ४२, आंद्रे रसेलने २४, जेसन रॉयने २० आणि अनुकुल रॉयने नाबाद १३ धावा केल्या. या पाच खेळाडूंशिवाय दुहेरी आकडा कुणालाही स्पर्श करता आला नाही. हैदराबादकडून मार्को जॅनसेन आणि टी नटराजन यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. भुवनेश्वर कुमार, कार्तिक त्यागी, मयंक मार्कंडे आणि एडन मार्कराम यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश मिळाले.

